स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

# शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

GOVT. DENTAL COLLEGE & HOSPITAL,CH. SAMBHAJINAGAR

पत्ता : धन्वंतरीनगर, घाटी परीसर, छत्रपती संभाजीनगर – 431 001

दुरध्वनी क्र.(०२४०) २४०२३८१/८२/८३ संकेतस्थळ-WWW.gdchcsn.ac.in ईमेल-gdca८३@yahoo.com

जा.क्र. शादंमरुछसं/आस्था-राजप/चि.स./एप्रिल-२६/जाहिरात/ ९८६ /२०२६, दि. 17 MAR 2026

जाहिरात प्रसिद्धी-

विषय:- दि.२८/०४/२०२६ ते दि.२७/०४/२०२७ या कालावधीच्या सत्रासाठी चिकित्सालयीन सहाय्यकांची पदे भरण्यासाठी अर्ज मागविणेबाबत..

संदर्भ:- कार्यालयीन मंजुर टिपणी दि.०७/०३/२०२६

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर या संस्थेच्या आस्थापनेवरील चिकित्सालयीन सहाय्यकांची रिक्त होणारी ०७ पदे भरण्याकरिता व ०८ चिकित्सालयीन सहाय्यक पदावर कार्यरत असलेल्या उमेदवारांची नियुक्ती पुढील सहा महिन्यांकरिता चालु ठेवणेस्तव विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जाचा विहित नमुना संस्थेच्या कार्यालयातील राजपत्रित आस्थापनेत दि.१०/०३/२०२६ ते दि.२०/०३/२०२६ या कालावधीत नि:शुल्क मिळेल.

पदांची आरक्षणनिहाय विभागणी खालीलप्रमाणे आहे.

| एकुण पदे | खुला | अ.जा. | अ.ज. | वि.जा. | भ.ज. | | | वि.मा.प्र | इ.मा.व. | एसईबीसी | ई.डब्ल्यु.एस (EWS) | शारिरीक दृष्ट्या अपंग (खुल्या प्रवर्गातुन ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ब | क | ड | | | | | |
| ०७ | ०३ | ०१ | ० | ० | ० | ० | ० | ०१ | ०२ | ०० | ० | ० |

(उपरोक्त पदांच्या संख्येमध्ये बदल करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकांनी राखुन ठेवलेला आहे.)

पात्रता:-

१) बी.डी.एस. (दंत) पदवी परीक्षा महाराष्ट्रातील मान्यता प्राप्त विद्यापीठातुन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२) १ वर्षाचा आंतरवासिता कालावधी समाधानकारकरित्या पुर्ण केलेला असला पाहिजे.

३) १ वर्षाचा आंतरवासिता कालावधी पुर्ण केल्यानंतर १ वर्षाच्या आत चिकित्सालयीन सहाय्यकांच्या पदाकरिता अर्ज करणे आवश्यक आहे.

४) ज्या उमेदवारांचा आंतरवासिता कालावधी कोणत्याही कारणास्तव वाढला असेल, त्यांचा १ वर्षाचा आंतरवासिता कालावधी हा दि.३१/०३/२०२६ पर्यंत पुर्ण होणे आवश्यक आहे.

५) ज्या उमेदवारांचा ०१ वर्षाचा आंतरवासिता कालावधी समाधानकारकरित्या पुर्ण झालेला नसेल, अशा उमेदवारांचा अर्ज चिकित्सालयीन सहाय्यक पदासाठीच्या निवडीसाठी ग्राह्य धरला जाणार नाही.

६) जे उमेदवार चिकित्सालयीन सहाय्यक किंवा निवासी/आवासी दंतचिकित्सक या पदावर नियमित स्वरुपात किंवा तात्पुरत्या स्वरुपात ३ महिने किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी कार्यरत आहेत किंवा ९० दिवस किंवा त्यापेक्षा अधिक दिवसांचा कालावधी पुर्ण केलेले उमेदवार या पदासाठी अर्ज करण्यास अपात्र ठरतील.

७) उमेदवाराने महाराष्ट्र दंत परिषदेकडे विधिग्रहण नोंदणी केलेली असली पाहिजे. (आवदेन पत्रासोबत नोंदणी पावतीसादर करावी.)

८) उमेदवार मागास प्रवर्गातील (आरक्षित प्रवर्गातील) असल्यास त्यांना सक्षम अधिका-यांचे जात प्रमाणपत्र (Caste Certificate), जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) तसेच अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती वगळुन इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी विहित करण्यात आलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate) (दि.३१/०३/२०२६ पर्यंत व पुढे वैधं असलेले) जोडणे आवश्यक आहे.

९) शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथील चिकित्सालयीन सहाय्यक या पदासाठी निवड व नियुक्ती वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शा.नि.क्र. डीईडी-१५८३/१७६-एमईडी-१, दि.२८/११/१९८३ अन्वये करण्यात येईल. पदावरील नियुक्ती/निवडीबाबतच्या नियमांच्या अवलोकन करण्याकरिता अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या प्रशासकीय कार्यालयातील सुचना फलकावर पहावे किंवा कार्यालयास भेट देण्यात यावी.

१०) आर्थिकदृष्ट्या दुर्बल (ईडब्ल्युएस) या संवर्गातील उमेदवारांना अर्ज करतांना, मुलाखतीस तसेच निवड झाल्यावर सामान्य प्रशासन विभाग, शा. नि. क्र. राधाओ-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि.१२/०२/२०१९ व शा.नि.क्र. बीसीसी२०१९ /प्र.क्र.११८ए/२०१९/१६-ब, दि.१६/०२/२०१९ मधील अटीं व शर्ती तसेच वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले व निर्गमित होणारे शासन निर्णय/ परिपत्रक/मार्गदर्शक सुचनांतील अटीं व शर्ती लागु राहतील.

११) शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर या संस्थेतुन बी.डी.एस. पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

१२) महाराष्ट्रातील शासकीय दंत महाविद्यालयातील बी.डी.एस. पदवी प्राप्त उमेदवारांना द्वितीय प्राध्यान्य देण्यात येईल.

(क्र.मागे पहा. पृ.क्र.०२ वर)

१३) नायर दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई या संस्थेतील बी.डी.एस. पदवी प्राप्त उमेदवारांना तृतीय प्राधान्य देण्यात येईल.

१४) महाराष्ट्रातील खाजगी दंत महाविद्यालयातील (भारतीय दंत परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता प्राप्त) संस्थेतील बी.डी.एस. पदवी प्राप्त उमेदवारांना अंतिमत: प्राधान्य देण्यात येईल.

१५) विहित नमुन्यातील आवेदन पत्रे (आवेदन पत्रात नमुद केलेल्या) आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह दि.१०/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० पासुन ते दि.२०/०३/२०२६ रोजी सायं.५ वाजेपर्यंत या कालावधीत कार्यालयीन दिवशी आवक शाखेत सादर करावा. या कालावधीनंतर प्राप्त झालेली आवेदन पत्रांचा निवड प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. **तसेच पोस्टाद्वारे प्राप्त झालेले आवेदन अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाही.**

१६) आवेदन पत्रासोबत खालील कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन अनुक्रमे सादर कराव्यात.

| | |
|---|---|
| १) एस.एस.सी. उत्तीर्ण प्रमाणपत्र (जन्मतारखेकरिता) | ७) प्रथम ते अंतिम वर्ष बी.डी.एस. गुणपत्रिका |
| २) राष्ट्रीयत्वाचा दाखला (डोमॅसाईल सर्टिफिकेट) | ८) प्रयत्न प्रमाणपत्र (अटेम्प्ट सर्टीफिकेट) |
| ३) महाराष्ट्र दंत परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र (नुतनीकरणाची प्रत) | ९) बी.डी.एस. उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र |
| ४) जात प्रमाणपत्र | १०) आंतरवासिता प्रशिक्षण पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र |
| ५) जात वैधता प्रमाणपत्र | ११) अनुभव असल्यास त्यासंबंधीचे प्रमाणपत्र |
| ६) नॉन क्रिमी लेयर प्रमाणपत्र | |

१७) अपुर्ण व उशिरा प्राप्त झालेले आवेदन पत्रे विचारात घेतले जाणार नाहीत किंवा त्याबाबत कोणत्याही पत्रव्यवहारास प्रतिसाद दिला जाणार नाही.

१८) अंतिम गुणवत्ता यादीत नाव समाविष्ट असलेल्या उमेदवारांनी आवेदन पत्रात नमुद केलेल्या माहितीच्या अनुषंगाने व सोबत जोडलेल्या कागदपत्रांनुसार मुळ प्रमाणपत्रांसह अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयात मुलाखतीस दि. ०७/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित रहावे.

१९) मुलाखतीसाठी कोणत्याही स्वरुपाचा भत्ता हे कार्यालय अदा करणार नाही. उमेदवारांनी स्वखर्चाने मुलाखतीस उपस्थित रहावे. चिकित्सालयीन सहाय्यक हे विद्यावेतनीय पद असल्याने त्यास रु. ७०००/- नियमाप्रमाणे चालु दराने महागाई भत्ता) शासनाच्या धोरणाप्रमाणे अदा करण्यात येईल.

२०) चिकित्सालयीन सहाय्यक म्हणुन रुजु होण्यापुर्वी त्यांना नियमाप्रमाणे एका महिन्यांचे विद्यावेतन (रु.७०००/-रु. सात हजार फक्त) सुरक्षा अनामत रक्कम शासकीय तिजोरित जमा करावी लागेल. नियुक्ती कालावधी संपल्यानंतर सर्व विभागांचे ना-देय प्रमाणपत्र तसेच कामाचा समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यांनतर अनामत रक्कम आपणांस परत करण्यात येईल. नियुक्ती कालावधी पुर्ण हाण्यापुर्वीच चिकित्सालयीन सहाय्यक पदावरील नियुक्ती सोडल्यास सुरक्षा अनामत रक्कम शासन खाती जमा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२१) चिकित्सालयीन सहाय्यक पदावर नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांना वस्तीगृहात निवासस्थान मिळणार नाही, त्यांना राहण्याची व्यवस्था स्वत: करावी लागेल.

२२) **ज्या चिकित्सालयीन सहाय्यकांना दि.२८/१०/२०२५ पासून सहा महिन्याच्या कालावधीसाठी नियुक्ती देण्यात आलेली आहे, त्यांनी पुढील सहा महिन्यांकरिता नियुक्ती पुढे चालु ठेवण्याबाबत विनंती अर्ज विभागप्रमुखांमार्फत दि.२०/०३/२०२६ वा त्यापुर्वी कार्यालयास सादर करावेत. ज्या चिकित्सालयीन सहाय्यकांनी नियुक्ती पुढे चालु ठेवण्यासाठी विंनती अर्ज कार्यालयास सादर केले नाहीत किंवा त्यांचा राजीनामा सादर केलेला असेल, अशा चिकित्सालयीन सहाय्यकांची जागा रिक्त गृहीत धरुन मुलाखतीस पात्र झालेल्या उमेदवारांची कॅज्युअल चिकित्सालयीन सहाय्यक म्हणुन (६ महिन्यासाठी फक्त) नियुक्ती करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

२३) सदर निवड प्रक्रियेतील कार्यवाहीत अंशत: बदल करणे/प्रक्रिया रद्द करणे/स्थगित करणे यासंबंधीचे तसेच इतर सर्वाधिकार निम्नस्वाक्षरीकार यांनी राखुन ठेवलेले आहेत.

(डॉ. मा. सं. इंदुरकर)
अधिष्ठाता,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

प्रति,

१.सुचना फलक, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

२.अधिष्ठाता, शा.दं.म.व.रु. छत्रपती संभाजीनगर वेबसाइट-www.gdchcsn.ac.in

प्रत:- अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई/नागपुर

प्रत:-अधिष्ठाता, नायर दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई

प्रत:-अधिष्ठाता/प्राचार्य, सी.एस.एम.एस.एस. दंत महाविद्यालय व रुग्णालय, कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर.

प्रत:-अधिष्ठाता/प्राचार्य, संबंधित सर्व मान्यताप्राप्त खाजगी दंत महाविद्यालये, महाराष्ट्र

प्रत:-मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत:- विभागप्रमुख, ---------------------------, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर.